**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक ०५/०३/२०२५ (बुधवार)**

---

## कन्हान उपविभागाअंतर्गत पोलीस स्टेशन मौदा हद्दीत काढण्यात आली बेटी बचाओ बेटी पढाओ जनजागृती रॅली

बेटी बचाओ बेटी पढाओ या उपक्रमाला १० वर्षे पुर्ण झाल्याने मा. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रमीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात कन्हान उपविभागात दिनांक ०४/०३/२०२५ रोजी मौदा येथे बेटी बचाओ बेटी पढाओ जनजागृती रॅली काढण्यात आली होती. सदर रॅली श्री सारीन दुर्गे , पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन मौदा यांच्या नेतृत्वात काढण्यात आली असुन सदर रॅली मध्ये पोलीस स्टेशन मौदा येथील सपोनि अजितसिंह देवरे, पोउपनि अरविंदकुमार जगणे, तसेच पोलिस स्टेशन मौदा चे अंमलदार यांच्या सह **शिर्डी साई पब्लिक स्कूल मौदा येथील विद्यार्थीनी व विद्यार्थी ,शिक्षक वृंद सहभागी झाले होते. सदर रॅली शिर्डी साई स्कूल येथून सुरू होऊन मुख्य मार्गाने बस स्टॅड – पोलिस ठाणे – शिर्डी साई पब्लिक स्कुल या मार्गाने काढण्यात आली होती. रॅली नंतर** श्री सारीन दुर्गे , पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन मौदा यांनी **शिर्डी साई पब्लिक स्कूल मौदा येथील विद्यार्थीनी व विद्यार्थ्यांना डायल –११२ प्रकल्प ,गुड टच बॅड टच, वाहतुकीचे नियम, सोशल मीडिया वापर, दामिनी पथक, पोलीस काका/पोलीस दीदी या विषयांवर मार्गदर्शन केले.**


WE WANT JUSTICE
पोलीस ठाणे, मौदा
मुलगी शिकली
प्रगती झाली
जनजागृती रॅली
SHIRDI SAI
& JUNIOR
SCHOOL
पोलीस ठाणे, मौदा
नागपूर ग्रामीण पोलीस
बेटी बचाओ
बेटी पढाओ
जनजागृती रॅली


पोलीस ठाणे, मौदा
बेटी बचाओ
बेटी पढाओ
जनजागृती रॅली

**अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ११आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.**

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक ०३/०३/२०२५ रोजी जलालखेडा पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फतीने माहीती मिळाली की, खापा (घुडन) जंगल परिसरात काही ईसम ५२ तासपत्यांचा पैशांची बाजी लावून हारजीतचा खेळ खेळत आहे. अशा खात्रीशीर माहीती वरून पोलीस घटनास्थळी पोहचले असता  जंगल परिसरात तलावाच्या काठावर काही इसम बेकायदेशीर जुगार खेळतांना दिसुन आले पोलीस आल्याची चाहुल लागताच सर्व इसमांनी पळ काढला पोलीसांनी शिताफीने ०४ आरोपी नामे  १) नितीन बाबाराव पेठे वय ३८ वर्षे, रा. घोगरा २) मुकेश दयारामजी घागरे, वय ४३ वर्षे, रा. खापा घुडन ३) मंगेष किसनाजी बारमासे वय ३३ वर्षे, रा. जलालखेडा ४) रुपचंद आपाजी पवार, वय २९ वर्षे, रा. घोगरा, यांना ताब्यात घेतले.

**आरोपीतांच्या ताब्यातुन ३ ॲड्राईड मोबाईल , ५ मोटर सायकल सह जुगाराचे सहीत्य आणि   रोख रक्कम ३७,२६०/—रूपये   असा एकुण किंमती १,३६,२६०/—रूपयांचा मुद्देमाल माल  जप्त करण्यात आला आहे. आरोपी नामे १) नितीन बाबाराव पेठे वय ३८ वर्षे, रा. घोगरा २) मुकेश दयारामजी घागरे, वय ४३ वर्षे, रा. खापा, घुडन ३) मंगेश किसनाजी बारमासे वय ३३ वर्षे, रा. जलालखेडा ४) रुपचंद आपाजी पवार, वय २९ वर्षे, रा. घोगरा, ५)भास्कर नामदेव इंगोले, रा. मेंढला, ६) गोलु रशीद मिर्झा, रा. जलालखेडा, ७)चंद्रशेखर ज्ञानबाजी काटोले, रा. खापा घुडन, ८) गोलु क्रिष्णाजी बोबडे, रा. खापा घुडन, ९) रामसिंग बहादुरसिंग भादा, रा. रामठी, १०) सुरजित सिंग चंदुनसिंग बावरी, रा. रामठी, ११) हर्षल किसनाजी वाडकर, रा. जलालखेडा  यांच्या विरूध्द १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर